SJIF Impact Factor - 5.54

E- ISSN 2582-5429

# AKSHARA

Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

February 2022 Special Issue 04, Vol. VI (C)

# CONTEMPORARY TRENDS IN HUMANITIES, COMMERCE AND LIBRARY SCIENCE (CTHCLS 2022)

Guest Editor

**Dr. Ganesh Anant Thakur**

Principal

Mahatma Phule Arts, Science and Commerce College, Panvel.
District. Raigad. Maharashtra. 410206

Executive Editor

**Mr. Sopan L. Gove**

IQAC Co-ordinator

M.P.A.S.C. College, Panvel

Associate Editor

**Mr. Sunil S. Avachite**

Librarian

M.P.A.S.C. College, Panvel

Chief Editor : Dr. Girish S. Koli, AMRJ
For Details Visit To - www.aimrj.com

Akshara Publication

E- ISSN 2582-5429

Akshara Multidisciplinary Research Journal

Peer-Reviewed & Refereed International Research Journal

February 2022 Special Issue 04 Volume VI (C) SJIF Impact- 5.54


| Sr.No. | Title of the paper | Author's Name | Pg.No |
|---|---|---|---|
| 23 | COVID-19 आणि आशा भविष्यातील विषाणूंच्या धोक्यांसाठी मानसिक रणनीती | डॉ. पुरुषोत्तम परीट | 85 |
| 24 | भारत-चीन संबंध : दशा आणि दिशा | डॉ. आय पी .कोकणे | 88 |
| 25 | महाराष्ट्रातील सामाजिक व राजकीय चळवळी आणि विचारधारा | प्रा. महेश बिऱ्हाडे | 92 |
| 26 | स्त्रीवादाचे समकालीन प्रवाह | डॉ. सौ. हेमलता आनंद सावंत | 95 |
| 27 | घायपात वनस्पतीचे जलसंधारण, मृदासंधारण व जैवविविधता संवर्धनातील महत्व | डॉ. राजाराम आप्पाजी पाटील | 97 |
| 28 | शाश्वत शेतीची सद्यस्थिती | डॉ. मुरलीधर पंडित गायकवाड | 100 |
| 29 | हरितग्रंथालये: काळाचीगरज | प्रा. वाय.बी. लबडे | 104 |
| 30 | महाविद्यालय ग्रंथालयमध्ये ई-संसाधने आणि माहिती सेवा उपयुक्त | श्री लिनताज भास्कर ऊके | 109 |
| 31 | ग्रंथ संरक्षण : काल, आज आणि उद्या | डॉ. शीला गोडबोले | 114 |
| 32 | समकालीन भारतीय इतिहास 1947 ते 2000 | प्रा. डॉ. प्रज्ञा कामडी | 117 |
| 33 | हिंदी साहित्य में स्त्री विमर्श | प्रा. पटेकर व्ही.सी. | 123 |
| 34 | मंजुल भगत के 'दूत' कहानी संग्रह में स्त्री विमर्श | प्रा. बगनर डी.के. | 126 |
| 35 | आदिवासी महिलाओं से शोधरुपी विशिष्ट समालाप | डॉ.संध्या जैन | 128 |
| 36 | समकालीन महिला साहित्यकारों के साहित्य में नारी-विमर्श | डॉ. सतीश शिंदे | 131 |
| 37 | साहित्य और सिनेमा का अंतसंबंध: | प्रा. स्वाती चव्हाण | 135 |
| 38 | हिंदी साहित्य में दलित विमर्श | प्रा. नारायण बागुल | 137 |
| 39 | `एकलव्य से संवाद` कविता में आदिवासी संवेदनाए | प्रा. मनोहर लोटे | 139 |
| 40 | साहित्य और सिनेमा | डॉ. पी.आर. नलावडे | 142 |
| 41 | किन्नर उदारीकरण: उद्यतन भारतीय समाज | डॉ. किरण खन्ना | 145 |
| 42 | `सीता मौसी` उपन्यास में स्त्री-संघर्ष | राठौड़ ज्योति चंद्रकांत | 148 |
| 43 | डॉ. विवेकी राय के समकालीन कहानियों में दलित विमर्श | डॉ. बामणे डी. के. | 153 |
| 44 | किन्नर विमर्श: थर्ड जेंडर के अधिकारों की और बढ़ते कदम | जयवीर सिंह | 159 |
| 45 | मीराबाई के काव्य में ऋतुवर्णन' | डॉ. संगीता माळी | 163 |
| 46 | हिंदी साहित्य में अभिव्यक्त वृद्ध विमर्श | प्रा. अविनाश कोल्हे | 168 |
| 47 | समाज और साहित्य का सिनेमापर प्रभाव | प्रा. राजेन्द्र देवाळकर | 171 |
| 48 | हिंदी साहित्य और वृतचित्र | प्रा. संदीप काळे | 174 |
| 49 | राजनीति विज्ञान और संशोधन एवं संकल्पना | प्रा. सुधाकर कांबळे | 176 |

म्हणजे ज्याप्रमाणे माणुस हा ग्रंथाचा उपयोग कर्ता आहे त्याचप्रमाणे ग्रंथाना हानी पोहचविणाराही तोच आहे. ग्रंथाच्या चोरीपासून ते ग्रंथाच्या वाचन प्रक्रियेतील कालावधीत ग्रंथाच्या अयोग्य हाताळणी व वापरामुळे काही वाचक त्या ग्रंथाचे शत्रुच ठरतात. ग्रंथ जोपासले गेले पाहीजेत. व तद्वतच ते वापरातही आले पाहिजेत. पण ग्रंथ ग्रंथालयीन यंत्रणेची नजर चुकवून घरी घेऊन जाण्यामुळे, ग्रंथ घरी घेऊन गेल्यानंतर त्यांची योग्य ठेवण व उपयोग व्यवस्थित न ठेवल्यामुळे वाचन करत असतांना अनेक प्रकारच्या नोंदी, रेषा उमटविल्यामुळे ग्रंथ विद्रुप करण्यासाठी वाचकच सर्वार्थाने जबाबदार असतो. काही वाचक

1. त्यांना हवी असलेली पाने फोटो कापून घेतात.
2. वाचन चालू असतांना त्यावर पेये सांडविणे.
3. पुस्तके मुडपून त्याची बांधणी तोडणे.
4. पाने दुमडुन ठेवणे.
5. पाने लक्षात रहावित त्यावर मार्क करणे.
6. योग्य संदर्भाला लक्षात ठेवण्यासाठी पेन वा मार्करने अंडरलाईन करणे.
7. पॅरा - कंसात टाकण्यासाठी मार्कींग करणे.
8. पाने उलटविण्यासाठी तोंडातील थुंकीचा वापर करणे.
9. वाचन चालू असतांना ती झोपेत उषाला ठेवणे.
10. अत्यंत बेजबाबदारपणे पुस्तके वेळेत परत न करता घरी कुठेतरी अनास्थेने ठेवणे .
11. पुस्तके आपणच विकत घेतल्याच्या अविर्भावात परस्पर इतरांना वापरावयास देणे व ते परत न घेण्याची बेजबाबदार वर्तन करणे.

उपयोगकर्ताच जर ग्रंथाचा शत्रु असेल तर ग्रंथालया यंत्रणेवरती पूढची जबाबदारी ठरते अशा वाचकांना सक्त ताकीद देऊन त्यांच्याकडील वाचन साहित्य परत मिळवित असतांना सुक्ष्मनिरिक्षण करणे अत्यंत महत्त्वाचे असते. त्यांनी ग्रंथाप्रती केलेल्या दुर्व्हाराप्रमाणे त्यांना दंड करणे अत्यंत आवश्यक असते. जेणेकरून हा संदेश इतर बेजबाबदार वाचकांपर्यत जाईल. कारण ग्रंथ संरक्षण ही केवळ ग्रंथपाल किंवा ग्रंथालयीन यंत्रणेचे कर्तव्य किंवा कार्य आहे असे समजणे चुकीचे ठरेल. ग्रंथसंरक्षण ही वाचकांचीही तितकीच जबाबदारी आहे.

**ग्रंथसंरक्षणातील अत्यंत महत्त्वाचे कार्य - ग्रंथालय स्वच्छता:**

ग्रंथाच्या संरक्षणसाठी अत्यंत महत्त्वाचा घटक म्हणजे ग्रंथालयीन अंतर्गत व बाह्य स्वच्छता. ग्रंथालयात –

1. स्वच्छता
2. टापटीप
3. साफसफाई

या कार्याला अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. ग्रंथालयात परिसर स्वच्छता. ग्रंथाची टापटीप रचना व नियोजनबद्ध व्यवस्था तसेच सर्वांगिण साफसफाई ही कामे प्राधान्याने केली गेली पाहीजेत कारण त्यामुळे धुळ राहणार नाही कारण कपाटे व पुस्तकांवरील धुळ ग्रंथाचे आयुष्य कमी करते. ग्रंथालयाच्या आतील भिंती, टेबल, खुर्ची, वृत्तपत्रांचे स्डॅंड व प्रत्येक वस्तु दररोज पुसली गेली पाहीजे. साचलेली जळमटे काढुन परिसर जास्तीत जास्त स्वच्छ ठेवायास हवा. अंतर्गत स्वच्छता जेव्हढी जास्त ठेवली तर कृमी किटकांपासून ग्रंथाचे संरक्षण करणे सोपे जाते.

पुस्तकांवरील धुळ वेळच्या वेळी साफ न झाल्यामुळे, जळमटे वेळच्या वेळी न काढल्यामुळे पुस्तकात वाळवी, उसर व झुरळ तसेच इतर अनेक किटकांचे वास्तव्य होते. त्यांना पोषक राहणीमान उपलब्ध झाल्यामुळे त्यांचे वास्तव्य कायम होण्याचा संभव असतो त्यासाठी पारंपारीक उपाययोजना अवलंबविल्या जावू शकतात.

**पारंपारीक उपाययोजना:**

ग्रंथाच्या संरक्षणासाठी काही ग्रंथालये कडूनिंबाची पाने, लालमिरच्या, तंबाखूच पाने, कांदा या घरगुती वस्तु या साधनांचा वापर करत आली आहेत. मात्र कालौघात ग्रंथ संरक्षणासासाठी आधुनिक तंत्रे वापरली जात आहेत. शास्त्रीय रसायने वापरून कृषी किटकांचा नायनाट करता येतो. आजपर्यंत अनेक ग्रंथालये यासाठी DDT Powder, Gamexin Powder अशी प्रतिरोधक औषधे वापरत. त्याशिवाय Paradychorlbenzene च्या लहान लहान बाटल्यांची बुच सैल करून कृषी प्रतिरोधक म्हणून वापरात येतो.

जळ, वाळवी किंवा उसरचा प्रादुर्भाव झालाच तर त्यासाठी Fumigation अत्यंत उपयोगी ठरते. वाळवीचा प्रादुर्भाव पाहता Fumigation चा कालावधी ठरविला जाऊ शकतो.

**ग्रंथसंरक्षणासाठीच्या अत्यंत महत्त्वाच्या उपाययोजनाः**

1. ग्रंथ वापरकर्त्यांसाठी अत्यंत कडक नियमावली.
2. ग्रंथालय आतील बाहेरील काटेकोर स्वच्छता.
3. ग्रंथालयातील तापमानाचे नियंत्रण (आर्द्रतेचे नियंत्रण)
4. जुन्या व दुर्मिळ ग्रंथाचे विशेष संरक्षणासाठी सातत्यपूर्ण निरिक्षण.
5. घातक रसायनांचा वापर करू नये त्यामुळे पुस्तके कायमची वाया जावू शकतात शिवाय वापरकर्ते व ग्रंथालयीन कर्मचार्यांना त्यांचा त्वचेद्वारे बाधा होऊ शकते.
6. अत्यंत कमी तीव्र स्वरूपाची किटकनाशके अत्यंत अनुभवी Pest Controller च्या मार्गदर्शनाखाली वापरावीत.
7. पुस्तके सातत्याने वापरात येण्यासाठी व त्यांना हाताळून स्वच्छ ठेवून किटकांपासून त्यांना दूर ठेवता येते.

**ग्रंथसंरक्षणासाठी एकात्मिक किड नियंत्रण प्रणालीः**

ग्रंथाचे संरक्षण करण्यासाठी विविध किटक, कृमी, उंदीर कारणीभूत ठरतात याशिवाय काही मानवी कृत्येही कारणीभूत ठरतात. तर काही नैसर्गिक घटक कारणीभूत आहेत जसे हवेतील आर्द्रतेचे प्रमाण. कोणत्याच एका उपायाने ही समस्या दुर होणार नाही त्यासाठी विविध स्तरावर उपाययोजणे कर्मप्राप्त ठरते त्यातही किटकांच्या निर्मुलनासाठी IMP (Integrated Pest Control Management) एकात्मिक किट नियंत्रण व्यवस्थापनाचा वापरच अत्यंत प्रभावी उपाय ठरू शकतो. अत्यंत तीव्र स्वरूपाच्या रसायनांमुळे अनेक प्रकारचे दुष्परिणाम होऊ शकतात तर अति वापरामुळे किटकांची प्रतिकार शक्ती वाढून ते कोणत्याच औषधांना दाद देत नाहीत यासाठी जनमान्य IPM ही प्रणाली वापरणे सर्वांच्याच अधिक उपयुक्त ठरेल.

संदर्भः

1. Kristin Masters (2011), www.bookstellyorthy.com
2. Baughman,M (2012), 'Approaches to Insect Problem in Paper of Books,
3. मराठे, ना. बा. ग्रंथसूचीशात्र, महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघ
4. Cornell University Library (Tutorial Library, Cornell Education)
5. Sahoo, Jyotahna, (2004) 'Preservation of Library Materials some Preventive Measures. Orrisa Historical Research Journal. Vol XLVII, no. 1.

□ □ □